# बृहन्मुंबई महानगरपालिका
## जाहिर सुचना

विषय :- अनधिकृत फेरीवाल्यांवर निष्कासनाची कारवाई करण्याकरीता कंत्राटी कामगार
**अशासकीय संस्था (एन.जी.ओ.)मार्फत पुरवठा करण्याबाबतची जाहिर सुचना.**

सदर सुचनेव्दारे नोंदणीकृत सर्व अशासकीय संस्थाना कळविण्यात येते की, एच/पश्चिम विभागातील अनधिकृत फेरीवाल्यांवर निष्कासनाची कारवाई करणेकामी खालील अटीनुसार कंत्राटी कामगार पुरविण्याबाबत इच्छुक अशासकीय संस्थांनी (एन.जी.ओ.) सहाय्यक आयुक्त एच/पश्चिम यांचे कार्यालय सेंट मार्टिन्स मार्ग, वांद्रे (पश्चिम), मुंबई - ४०० ०५० यांचे नावे नोंदणी प्रमाणपत्र असलेल्या संस्थांनी खालील नमुद आवश्यक कागदपंत्रासहीत दि.२७.०५.२०२१रोजी पर्यंत दुपारी १.०० वाजेपर्यंत सिलबंद अर्ज अनुज्ञापन खाते, एच/पश्चिम विभाग, तळमजला, येथे सिलबंद पेटीत टाकावे.

अशासकीय संस्था (एन.जी,ओ.) संस्थांनी अर्जासोबत खालील कागदपंत्राची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१. सदर कामांसाठी फक्त स्थानिक एच/पश्चिम विभागातील अशासकीय संस्थांनी (धर्मदाय आयुक्त यांच्याकडे नोंदणीकृत संस्था) अर्ज करावेत.

२. दि. ०२.०५.२०२१ ते ३१.०७.२०२१ (तीन महिने) (किंवा कार्यदिशाच्या दिनांकापासून जे नंतर असेल) ०३ महिन्याच्या कालावधीकरीता आवश्यकतेनुसार कामगार पुरविणे.

३. प्रतीदिन प्रती कामागार रु.६५३.६५ अधिक ४९.५८% लेव्हीचे अधिदान परिपत्रक क्र. प्रकाअ/१०/दि. ०२.११.२०२० चा अटीच्या पूर्ततेनंतर ( प्रतीपूर्ती स्वरूपात ) करण्यात येईल.

४. एच/पश्चिम विभागातील अधिकाऱ्यांच्या सुचनेनुसार रोजच्या कामामरीता मागणी केल्याप्रमाणे (सकाळ/दुपार/रात्र)सुरळीतपणे विनाविलंब, सक्षम कामगांराचा पुरवठा करणे. सदर अटींचा भंग झाल्यास प्रपत्र ब प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

५. पुरवठा केलेल्या कामगारांचा द्येकाची रक्कम बृहन्मूंबई महानगरपालिका नियमांनुसार आवश्यक पडताळणी व लेखा परिरक्षणानंतर विभागीय लेखा सांकेतांक २२०८००४०० या लेखाशिर्षातून संबंधित संस्थेला ई.सी.एस. /एन.ई.एफ.टी. व्दारे अधिदान केले जाईल.

६. संस्थेने त्यांच्याकडे कार्यरत असलेल्या कामगारांना प्रत्येकी महिन्याच्या १० तारखेच्या आत दरमहा वेतनाचे अधिदान आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी व्दारे करणे बंधंनकारक राहिल. तसे न केलयास संस्थेचे काम रद्द करून संस्था काव्या यादीत टाकण्यात येईल. महानगरपालिकेकडून आर.टी.जी.एस. / एन.ई.एफ.टी व्दारे अधिदान मिळाले नसले तरीही कामागारांना विहित अधिदान करणे बंधनकारक आहे. अन्यथा प्रपत्र ब प्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल.

७. बाल कामगांराचा पुरवठा करणे निषिध्द आहे व तसे केल्यास त्यांची संपुर्णत: कायदेशीर जबाबदारी संबंधीत अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांचीच राहिल.

८. अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांनी नोंदणी प्रमाणपत्र , बँक खात्याचा तपशिल, मागील वर्षाचा ताळेबंद अहवाल व कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

९. उपरोक्त अटींचे पालन न करणाऱ्या व समाधानकारकरीत्या काम न करणाऱ्या अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांचेकडून कामगार पुरवठा करण्याचे काम त्वरीत थांबविण्याचे अधिकार सहाय्यक आयुक्त एच/पश्चिम विभाग यांना राहतील.

१०. अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) यांचेकडून विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करून लॉटरी पध्दतीने एक पात्र अशासकीय संस्थेची (प्रत्येकी १० कामगार) निवड करण्यात येईल. उपरोक्त निकषामध्ये न बसणाऱ्या संस्थाना कोणतेही कारण न देता अपात्र ठरविण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**१३.०४.२०२१**
**सहाय्यक आयुक्त एच/पश्चिम विभाग**

# बृहन्मुंबई महानगरपालिका
## (अनुज्ञापन अतिक्रमण निर्मुलन एच/पश्चिम विभाग)
## स्वारस्य अभिव्यक्ती
## जाहिरात

**विषय: एच/पश्चिम विभागामध्ये अतिक्रमण निर्मुलन वाहानांवर संस्थेकडून कामगार घेण्याबाबत.**

एच/पश्चिम विभागामध्ये अतिक्रमण निर्मुलन वाहानांवर संस्थेकडून कामगार घेण्याबाबत ०१ (प्रत्येक संस्था १० कामगार) संस्थेची निवड करण्याकरीता अशासकीय संस्थेची एच-पश्चिम विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असणाऱ्या इच्छुक स्थानिक मोंदणीकृत मजुर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, औद्योगिक सेवा सहकारी संस्था इ. संस्थेकडून त्यांची पात्रता यादी तयार करून सोडत पध्दतीने निवड करून काम करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. या निवड झालेल्या संस्थेकडून सकाळ सत्र ०५ व दुपार सत्र ०५ कामगार असे एकूण १० कामगारांची आवश्यकता आहे.

अर्जाचा नमुना एच-पश्चिम विभाग कार्यालयातील वरिष्ठ अनुज्ञापन निरीक्षक (अतिक्रमण निर्मुलन) यांच्या कार्यालयात रू. ११००/- अधिक ०५ % GST रोख स्वरूपात (ना परतावा) दि.२४.०५.२०२१ ते दि.२५.०५.२०२१ सकाळी १०.३० ते दुपारी ०१.०० यावेळेत विकत मिळू शकेल. पात्र संस्थाच्या यादीमधुन सोडत पध्दतीने यशस्वी झालेल्या संस्थेला कामाचे वाटप संबंधीत विभागाचे सहाय्यक आयुक्त योजनेच्या अटी व शर्तीनुसार करतील.

इच्छुक संस्थानी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी एच/पश्चिम विभाग अनुज्ञापन अतिक्रमण निर्मुलन कार्यालयात संपर्क करावा. संस्थेने एच/पश्चिम विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख २७.०५.२०२१ (दुपारी १.०० वाजेपर्यंत) नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

सही/-

१३.०४.२०२१

**सहाय्यक आयुक्त एच/पश्चिम**